महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

सोमवार ■ २१ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०३० ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# पक्ष संघटन बळकट करणारा प्रत्येक शिवसैनिक महत्वाचा - ना. योगेश कदम

## ● बल्याणी येथील ५०० विद्यार्थ्यांचा सन्मान





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता :

**टिटवाळा :** राज्यमंत्री योगेश कदम यांनी आज (दि.२० जून) आंबिवली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, शिवसेना मुख्य शाखेला सदिच्छा भेट देऊन शाखेचे कार्य आणि संघटनात्मक घडामोडींचा आढावा घेतला. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना स्थानिक पातळीवरील पक्षबळ वाढवण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले. या प्रसंगी आमदार विश्वनाथ भोईर, मा.नगरसेवक मयूर पाटील तसेच पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.


गृहाराज्य मंत्री योगश कदम यांच्या विरोधात शिवसेना ठाकरे गट आक्रमक झाला आहे. त्यांच्या बारचा मुद्दा विधान परिषदेत उपस्थित करत शिवसेना आमदार अनिल परब यांनी कदम यांची कोंडी केली होती. शिवाय त्यांच्या राजीनाम्याची मागणी ही केली होती. त्यांच्या बचावासाठी त्यांचे वडील रामदास कदम ही मैदानात उतले होते. त्यांनी ही या प्रकरणी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला आहे. आता थेट योगेश कदमच ठाकरेंना भिडताना दिसत आहेत. त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका करत प्रत्युत्तर दिलं आहे.


उद्धवजी काँग्रेस नेत्या सोनिया गांधींना भेटण्यासाठी दिल्लीला जातात. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात मुख्यमंत्री होण्यासाठी काँग्रेसचे तळवे चाटतात. वंदनीय बाळासाहेब असते, तर असं काही झालं असतं का? अशा शब्दांत राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. योगेश कदम हे कल्याणजवळील बल्याणी येथे शिवसेना नेते मयूर पाटील यांच्या वतीने आयोजित विद्यार्थी सन्मान कार्यक्रमात उपस्थित होते.

कल्याणच्या बल्याणी येथे 500 विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा सन्मान गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी स्पष्ट आणि थेट उत्तरं दिले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दिल्ली भेटीवर उद्धव ठाकरे यांनी 'शिंदे चोरीने भेटतात' अशा प्रकारचा टोला लगावला होता. त्याबाबत विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात योगेश कदम यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. मुख्यमंत्री होण्यासाठी काँग्रेसचे तळवे चाटले, तेव्हा काय होतं? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

तसेच आदित्य ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांची एका हॉटेलमध्ये झालेली भेट यावर प्रतिक्रिया देताना कदम म्हणाले, राज्यात काही लोक असा अपप्रचार करत आहेत की शिवसेना आणि भाजपामध्ये काही बिनसले आहे. मात्र, शिवसेना आणि भाजपामध्ये उत्तम समन्वय आहे.

कृषीमंत्र्यांचा रमी खेळताना व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यावर प्रतिक्रिया देताना कदम म्हणाले, "मी तो व्हिडिओ पाहिलेला नाही." तसंच उद्धव ठाकरे यांच्या मुलाखतीबाबत ते म्हणाले, "उद्धव ठाकरे यांची मुलाखत कोणीच पाहत नाही. स्वतःच्याच नेत्यांकडून मुलाखत घ्यायची आणि स्वतःच उत्तरं द्यायची, अशी मुलाखत आम्ही जगात पहिल्यांदाच पाहतो आहोत. त्यामुळे अशा मुलाखतींना आम्ही काही महत्त्व देत नाही." असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला.



### जिल्हा परिषद , पंचायत समितींच्या
## प्रभाग रचना मसुद्यावर पाच हरकती दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** गेल्या दोन वर्षांपासून रखडलेल्या ठाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुका येत्या काही महिन्यात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या निवडणुकांसाठी जिल्हा निवडणुक विभागाने प्रभाग रचना मसुदा नुकताच प्रसिद्ध करत त्यावर नागरिकांना हरकती सादर करण्याचे आवाहन केले आहे. आतापर्यंत केवळ पाच हरकती निवडणुक विभागाकडे दाखल झाल्या आहेत.

ठाणे जिल्हा परिषदेच्या सदस्यांची मुदत ही १४ जानेवारी २०२३ रोजी संपुष्टात आली. तेव्हापासून जिल्हा परिषदेचा कारभार प्रशासकीय राजवटीखाली सुरु आहे. त्यामुळे मागील २ वर्षापासूनठाणे जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प प्रशासन सादर करत आहे. दोन ते पाच वर्षांपासून रखडलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दोन महिन्यांपुर्वी निवडणूक आयोग आणि राज्य सरकारला दिले. यानंतर राज्य सरकारने निवडणुकीसाठी आवश्यक असलेली तयारी सुरू केली असून त्याचाच एक भाग म्हणून ठाणे जिल्हा निवडणुक विभागाने ठाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी आवश्यक असलेली प्रभाग रचना तयार करून ती अंतिम करण्याचे काम सुरू केले आहे. या प्रक्रीयेसाठी जिल्हा निवडणुक विभागाने प्रभाग रचना मसुदा नुकताच प्रसिद्ध केला आहे.

ठाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकांसाठी जिल्हा निवडणुक विभागाने प्रभाग रचना मसुदा नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्याची प्रत ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय तसेच कल्याण, भिवंडी, शहापूर, मुरबाड, अंबरनाथ तहसिलदार आणि पंचायत समिती कार्यालयातील फलकावर प्रसिध्द करण्यात आली आहे. या मसुद्यास कुणाची हरकत किंवा सूचना असल्यास त्यासंबंधीची सकारण लेखी निवेदने, हरकती आणि सूचना ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे २१ जुलै २०२५ पर्यंत सादर करण्याचे आवाहन ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे. २१ जुलैनंतर आलेली निवेदने, हरकती, सूचना या विचारात घेतले जाणार नाहीत, असेही त्यांनी यापुर्वीच स्पष्ट केले आहे.

ठाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकांसाठी जिल्हा निवडणुक विभागाने प्रसिद्ध केलेल्या प्रभाग रचना मसुद्यावर हरकती दाखल होण्यास सुरूवात झाली आहे. आतापर्यंत ५ हरकती केवळ दाखल झाल्या आहेत. त्यामध्ये गटाला अमुक गावाचे नाव देणे अपेक्षित असताना दुसऱ्या गावाचे नाव देण्यात आले, क्षेत्र लांब असणे अशा अनेक हरकतींचा त्यात समावेश असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

## भर पावसाळ्यात शहापूर तालुक्यात पाण्याचे दुर्भिक्ष्य

### सरकारची 'हर घर नल ' घोषणा सपशेल अपयशी?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

-: भरत उबाळे :-

**शहापूर, ता.२० :** तालुक्यातील कसारा घाटाच्या डोंगररांगांमध्ये वसलेल्या बिबळवाडी या आदिवासी वस्तीत भर पावसाळ्यातही पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे. तहान भागावी आणि पाण्याची गैरसोय दूर करण्यासाठी वस्तीतील महिला दीड किमी अंतरावरून डोक्यावरील हंड्यांनी पाणी वाहून नेत आहेत. यात विशेष म्हणजे २५० वर्षापूर्वीची पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेली विहीर मोठा आधार ठरली आहे. सध्या याच दीड किमी अंतरावरील या विहिरीवरून बिबळवाडीतील महिला पाणी आणत आहेत. शिल्पकलेचा वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण असलेली ही विहीर येथे टोपाची बारव या नावाने ओळखली जाते.

कसारा घाट माथ्यावर वसलेल्या बिबळवाडीत जानेवारीपासून तीव्र पाणीटंचाई होती. जून महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत या वस्तीला टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत टँकरने पाणीपुरवठा सुरू होता. पाऊस चांगला कोसळत असल्याने टंचाई कार्यक्रमातील टँकरचा पाणीपुरवठा थांबवण्यात आला, परंतु या वस्तीत शाश्वत पाणीपुरवठ्याचे पर्यायी स्त्रोत उपलब्ध नसल्याने जुलैमध्येही भरपावसात पाण्याचे दुर्भिक्ष्य सतावू लागले आहे.

बिबळवाडीत मूलभूत वीजपुरवठ्याचीही परिपूर्ण व्यवस्था नाही. सौरऊर्जेवर पाणीयोजना सुरू करण्यात आली होती. ही योजना देखभाल दुरुस्तीअभावी निकामी ठरली. त्यामुळे बिबळवाडीतील पाणीपुरवठ्याचे दुष्टचक्र आणखीनच सतावू लागले आहे. बिबळवाडीला स्वातंत्र्योत्तर काळापासूनच पाणीसमस्या सतावत आहे. त्यावर आजतागायत कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे पाण्याने भरलेले दोन-तीन हंडे डोक्यावर घेऊन दगड, गोट्यांची चिखलातली पायवाट तुडवत उंच टेकडी ओलांडून वस्तीत पाणी आणावे लागत आहे. पाण्याच्या गैरसोयीने येथील नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहेत. 'आम्हाला पाणी द्या' अशी आर्त मागणी करत आहेत.

'हर घर नल' घोषणा अपयशी

बिबळवाडीत आदिवासींची ७० कुटुंबे असून ३५० लोकसंख्या आहे. वर्षभरापूर्वी एका कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून अर्थात सीएसआर निधीतून सौर ऊर्जेवर चालणारी लघु पाणीपुरवठा योजना राबविली होती. योजनेची पाणी उचलण्याची मशीन वर्षभरापासून बंद स्थितीत असल्याचे येथील ग्रामस्थांनी सांगितले. योजनेच्या आधारावरच घराघरात नळजोडण्या देण्यात आल्या होत्या, मात्र सद्यस्थितीत येथील नळांना पाणीच नसल्याने सरकारची 'हर घर नल' ही घोषणा अपयशी ठरली आहे.

**पाणीयोजना दुरुस्तीसाठी सीएसआर निधीचीच गरज**

सौर ऊर्जेवरील पाणीयोजना दुरुस्त करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दुरुस्तीसाठी पुन्हा सामाजिक उत्तरदायित्व निधी उपलब्ध व्हावे, यासाठी मागणी केली आहे. हा निधी उपलब्ध झाल्यास नादुरुस्त सौर पॅनेल बदलून घेतले जाऊ शकतात. यासोबतच आवश्यक आणखी काही तांत्रिक साधने बदलून घेता येतील. सौर ऊर्जेवर चालणारी पाणीपुरवठा योजना हा एकमेव पाणीपुरवठ्याचा स्रोत बंद असल्याने दीड किमी अंतरावरून पाणी आणावे लागते ही वस्तुस्थिती आहे, असे ग्रामसेवक सतीश ठाकरे यांनी सांगितले.




## कल्याण बाजार समितीच्या ताब्यातील मोकळा भूखंड व्यापाऱ्यांच्या घशात

### संचालक मंडळाला ताबा देण्यास नकार

### अधिकृत व्यापाऱ्यांचा मंगळवारपासून बेमुदत संपाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :: शरद शहाणे**

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ताब्यातील मोकळा सोयीसुविधानसाथी राखीव असलेला भूखंड व्यापारी संघटनेला घाईगर्दीत प्रशासकीय राजवटीत देण्यात आला आहे. या भूखंडाचा ताबा देण्यास सचलक मंडळाने नकार दिला असताना ही, व्यापारी संघटनेने मनमानी करत या भूखंड ताब्यात घेण्यासाठी हालचाली केल्याने संतप्त संचालक मंडळाने बाजारपेठ पोलीस स्थानकात तक्रार केली आहे. मात्र हा भूखंड रिव्हाईज पद्धतीने घेतला असल्याचे सांगत व्यापारी संघटनेने दिशाभूल करत बाजार समितीचे ताबा पत्र नसताना पणन संचालकाने घातलेल्या अटी शर्थी चा भग करत मनमानी सुरु केल्याने बाजार समितीचे सभापती, उपसभापती व सर्व संचालकाणी आमदार किसन कथोरे यांची भेट घेऊन हा भूखंड करार रद्द करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या बाबत वास्तव स्थिती समजून सांगणार आहेत.

शेतकऱ्यांसाठी सुविषा देण्यासाठी बाजार समिती आहे. मात्र व्यापाऱ्यांचे हित प्रशासकीय राजवटीत पहिले गेल्याने शेतकरी सांतप्त झाले आहेत. बाजार समिती संचाळक मंडळाची पंच वार्षिक निवडणूक नुकताच सपन्न झाली, 10 जुलै 2025 रोजी सभापती, उपसभापतीची निवडणूक झाली आहे.

**बाजार समिती आवरातील व्यापाऱ्यांचा संपाचा इशारा**

लक्ष्मी भाजी मार्केट संघटनेने मनमानी करत पन्नास गुंठे जागा ताब्यात घेण्याच्या हालचाली सुरु केल्याने येथील व्यापारांना त्याचा वाहने ये जा करण्यासाठी होणारा त्रास त्यामुळे या व्यापाऱ्यांनी मंगळवार 22 जुलै 2025 पासून बेमुदत व्यापार बंद करण्याची घोषणा केली आहे; अशी माहिती व्यापारी प्रतिनिधी गणेश पोखरकर यांनी दिली.













## दिवा- सीएसएमटी लोकलसाठी प्रवाशांचा एल्गार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : दिवा रेल्वे स्थानकातून दिवा- सीएसएमटी उपनगरीय रेल्वे सेवा तात्काळ सुरू करावी या मागणीसाठी रविवारी दुपारी दिव्यातील नागरिकांनी रेल्वे स्थानकाबाहेर आंदोलन केले. या आंदोलनामध्ये दिव्यातील नागरिकांनी मोठ्याप्रमाणात सहभाग घेतला होता. सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर ठाणे लोहमार्ग पोलिसांनी स्थानक परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. आंदोलनाच्या कालावधीत दिवा स्थानक परिसरात वाहतुक कोंडी झाली होती.

दिवा शहरात मोठ्याप्रमाणात नागरिकरण वाढले आहे. या नागरिकामुळे रेल्वे प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या देखील वाढली आहे. दिवा रेल्वे स्थानकात दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. मुंबईत प्रवास करण्यासाठी येथील रहिवाशांना रस्ते वाहतुकीचा चांगला पर्याय नसल्याने दिवा रेल्वे स्थानकावर वाहतुकीचा ताण अधिक वाढला आहे. काही दिवसांपूर्वीच मुंब्रा येथील रेल्वे अपघातामध्ये रेल्वेगाड्यांमध्ये होणाऱ्या गर्दीचा प्रश्न ऐरणीवर आला होता.

दिवा रेल्वे स्थानकात जलद रेल्वेगाड्यांना थांबा आहे. परंतु यातील बहुतांश रेल्वेगाड्या कर्जत, कसारा भागातून सुटणाऱ्या आहेत. या रेल्वेगाड्यांमध्ये प्रवाशांनी भरून येत असल्याने दिवा स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सकाळच्या वेळेत या रेल्वेगाड्यांमध्ये प्रवेश करणे शक्य होत नाही. तसेच धिम्या रेल्वेगाड्यांमध्ये गर्दी असते. त्यामुळे प्रवाशांमध्ये हाणामारीचे प्रसंग उद्भवतात. दिवा-सीएसएमटी रेल्वेगाडी सुरु करण्यात यावी या मागणीसाठी दिव्यात या पुर्विही अनेक आंदोलने झाली आहेत .

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

## वाचक मनोगत

# जयंत पाटलांचा गड ढासळतोय?

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील भाजपमध्ये जाणार, अशा चर्चा रोज माध्यमांतून सुरू असतात. त्यामुळे जयंत पाटील यांच्याभोवतीचं संशयाचं भूत काही कमी होताना दिसत नाही. त्यातच या पक्षातील नेत्यांचे 'आऊटगोईंग' मोठ्या प्रमाणात सुरू झालं आहे. त्यांच्याच मतदारसंघातील अनेक दिग्गज नेते भाजपसह अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करताना दिसत आहेत. आतातर जयंत पाटील यांचे खंदे समर्थक मानले जाणारे जिल्ह्याचे माजी पालकमंत्रीच भाजपच्या वाटेवर निघाल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. यामुळे जिल्ह्यात अनेकांच्या भुवया उंचावल्या असून याप्रवेशा मागचे नेमके गूढ काय, याचीच चर्चा आता सर्वत्र होताना दिसत आहे.

खरे तर डांगे हे मूळचे संघ परिवारातले नेते. 2003 मध्ये त्यांनी भाजपचा त्याग करून राजकीय संन्यास घेतला आणि पुढे संन्यास मोडून ते पुन्हा राजकारणात सक्रीय झाले. त्यावेळी त्यांचा मोठ्या डौलात राष्ट्रवादीत प्रवास झाला. खरंतर भाजपने डांगे यांना मंत्री करून मोठी संधी दिली होती. मात्र भाजपची सत्ता गेल्यानंतर डांगे यांनीही पक्षाला रामराम करत राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्या वेळी भाजपमध्ये मुंडे-महाजन पर्व सुरू होते आणि पक्षनेतृत्वाशी मतभेद झाल्याने नाराजी व्यक्त करत डांगे यांनी भाजप सोडला होता.

भाजपने डांगेंना मोठे केलं आणि अण्णांनीही पक्षासाठी तळागाळापर्यंत काम केले. आता अण्णासाहेब डांगे यांनी वयाच्या नव्वदीत भाजपमध्ये जाण्याचा घेतलेला निर्णय हा सर्वसामान्यांबरोबरच भाजपच्या शीर्ष नेतृत्व आणि अन्य पक्षांनाही अचंबित करणारा आहे. राष्ट्रवादी प्रवेशाच्या वेळी अण्णासाहेब डांगे यांनी एका गाजलेल्या मराठी गीताचा उल्लेख करत 'शेवटचे घरटे माझे तुझ्या अंगणात...' असे शरद पवार यांना सांगत प्रवेश केला होता. मात्र आता अण्णांना पुन्हा घरट्यासाठी अंगण बदलावं लागलं आहे, ही एक राजकीय अपरिहार्यता आहे की महायुतीचा डाव असंही आता पंचक्रोशीत बोललं जात आहे.

जयंतरावांचे प्रदेशाध्यक्षपद जाणे आणि त्यानंतर त्याच दिवशी डांगे यांनी पक्ष सोडणे या दोन्ही गोष्टींचा योगायोग समजायचा की यातून काही आणखी अर्थ काढायचा, हा देखील संभ्रम यातून निर्माण झाला आहे. कारण जयंतरावांनी इस्लामपूरच्या राजकारणात चिमण डांगेंना उपनगराध्यक्ष, अध्यक्ष करून संधी दिली होती. जयंतरावांच्या राजकारणात गेली काही वर्षे डांगे त्यांच्यासमवेत राहिले आहेत. आपल्या पुढील पिढीचे हित कशात आहे, हे बापच चांगले ओळखत असतो आणि याच एका अर्थाने डांगे यांनी एकदा सोडलेल्या भाजपच्या अंगणात पुन्हा आपले घरटे नेले आहे. स्थानिक भाजप याबाबत अनभिज्ञ आहे की काय, असे वाटते. परवाच जयश्री पाटील यांचा भाजपमध्ये प्रवेश झाला. तो घडविण्यात 'जनसुराज्य'चे नेते समित कदम यांनी पुढाकार घेतला. आता डांगे यांच्या मुख्यमंत्र्यांशी भेटीवेळीही समित कदम यांचाच पुढाकार दिसून आला. तत्पूर्वी राष्ट्रवादीचेच विट्याचे नेते वैभव पाटील यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. राष्ट्रवादीचे महापौर म्हणून राहिलेले आमदार इद्रिस नायकवडी की, ज्यांचे वडील जनाब इलियास नायकवडी हे राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष होते. त्यांचे घराणेही आता राष्ट्रवादी सोडून अजितदादांच्या राष्ट्रवादीत गेले आहे. अशा पद्धतीने दस्तूरखुद्द जयंत पाटील प्रदेशाध्यक्ष असतानाच त्या पक्षातूनच या जिल्ह्यामध्येच 'आऊटगोईंग' मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसते. जयंतराव आणि भाजप हे 'कनेक्शन' फार पूर्वीपासून आहे. अशातच त्यांच्याच पक्षातील त्यांच्याच प्रदेशाध्यक्ष काळात अनेक दिग्गज नेते भाजपच्या वाटेवर जाऊ लागले आहेत. एक काळ संपूर्ण महाराष्ट्रात सांगली हा राष्ट्रवादीचा सर्वांत मोठा गड होता. या जिल्ह्यातील काही दिग्गज हे सुरुवातीला राष्ट्रवादीत गेल्याने या पक्षाची राज्यातील ताकद वाढण्यास मदत झाली होती, हे वास्तव आहे. आता राष्ट्रवादी रिकामा होतानाही दिसत आहे. याच जिल्ह्यात याच पक्षाला सांगलीतून मोठे भगदाड पडू लागले आहे. याचे शल्य अर्थातच सात वर्षे पक्षाचे नेतृत्व करणाऱ्या जयंतरावांना वाटत असणार. या पक्षाची धुरा ज्या शशिकांत शिंदे यांच्यावर आली आहे, त्यांच्यासमोर हे 'आऊटगोईंग' थांबवण्याचे मोठे आव्हान असेल.

**राजेश पडळकर**

# शक्तीपीठ आणि शेतकरी



बीड, परभणी, धाराशिव, सोलापूर, कोल्हापूर, सांगलीसह राज्यभरातल्या अनेक भागांमध्ये शेतकरी शक्तिपीठ महामार्गाला विरोध करत आहेत. त्यासाठीची आंदोलनं करत आहेत. या महामार्गामुळे शेती तर जाईलच पण इतर अनेक प्रश्नं निर्माण होतील, असं त्यांचं म्हणणं आहे. सुशीलकुमार शिंदे सांगतात, "आमच्या गावात नंबर वाट असेल, गाडी वाट असेल, पाऊलवाट असेल, शिवरस्ता असेल हे पूर्ण रस्ते या शक्तिपीठ महामार्गाखाली दबून जाणार आहेत."

तर वरवटीचे व्यंकट ढाकणे म्हणतात, "माझी दोन ठिकाणी चार-चार एकर जमीन चाललीय. इकडच्या ठिकाणी आणि इकडच्या ठिकाणी थोडी जमीन राहिलीय आणि बरोबर मधी पूर्ण जमीन शक्तिपीठसाठी चाललीय.

शक्तिपीठ महामार्ग 20 फूट उंच असल्यामुळे इकडच्या जमिनीतून तिकडच्या जमिनीत जायला रस्ता नसतो, त्यासाठी 10-10 किलोमीटर लांब जावं लागतं. एवढ्या लांबून शेती होत नसते. मग ती सोडूनच द्यावी लागते."

शक्तिपीठ महामार्गामुळे धसका घेतलेले शेतकरी भीमाशंकर बादगुडे आणि मारोती डांगे यांनी त्यांची भीती अशी बोलून दाखवली. 802 किलोमीटर लांबीचा शक्तिपीठ महामार्ग राज्यातील वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या 12 जिल्ह्यांना जोडणार आहे.

या महामार्गाला गती देण्यासाठी सरकारनं नुकतीच 20 हजार 787 कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता दिली आहे. शेतकऱ्यांचा मात्र या महामार्गाला विरोध आहे.

भीमाशंकर बादगुडे यांची तुळजापूरच्या वानवडी शिवारात जमीन आहे. 2024 मध्ये राज्य सरकारनं एक अधिसूचना प्रसिद्ध करत शक्तिपीठ महामार्गासाठी कोणत्या गावातल्या कोणत्या गटातून किती जमीन संपादित केली जाणारे हे स्पष्ट केलं. भीमाशंकर सांगतात, "माझ्याकडे 15 एकर शेती आहे. 15 एकरमधली साडेपाच एकर शक्तिपीठात चालली. पण, ही जमीन गेली तर मागे लेकरं बाळ आहेत आम्हाला. काय करून खावं आम्ही ? आमच्यात नोकरीला तर कुणीच नाही. आम्हाला शेतीशिवाय दुसरं काही येत नाही." शक्तिपीठ महामार्गाकरता जमीन मोजणीसाठी शासनाचे कर्मचारी आले, तेव्हा तुळजापूर आणि बार्शीमधील शेतकऱ्यांनी त्यांना विरोध केला. त्यानंतर शेतकरी आणि या कर्मचाऱ्यांमध्ये झटापट झाली. यात भीमाशंकर यांच्या पायाला जखम झाली. तिचे व्रण अजूनही आहेत.

> "मी भ्यायला लागलो हो. म्हणजे काय झालं मला दचका पडायला लागला ना. यानं अचानक फोन केला की मी घाबरलो. म्हटलं आलं की काय बाबा परत कुणी. कारण असाच दोन दिवस राडा झाला ना आमचा."
> – भीमाशंकर बादगुडे, शेतकरी, वानवडी-धाराशिव

> "कुणीही आला, इकडून आला, तिकडून आला की छातीत आम्हाला अशी धडकी भरल्यावानी होते. वाटतंय झटका येते की काय."
> - मारोती डांगे, शेतकरी, वरवटी-बीड




### सरकार शक्तिपीठवर ठाम

देवेंद्र फडणवीस 04 जुलै 2025 रोजी माध्यमांशी बोलताना म्हणाले की, "सरकारची भूमिका अतिशय स्पष्ट आहे. शक्तिपीठ महामार्ग आम्ही करणार आहोत. या संदर्भात जे अडचणीचे मुद्दे आहेत, त्यात चर्चेने मार्ग काढणार आहोत. या महामार्गाला अधिक लोकांचा पाठिंबा आहे, काही राजकीय लोक जाणीवपूर्वक राजकारण आणून त्याच्यामध्ये वेगळ्या प्रकारे त्याला नेण्याचा प्रयत्न करताहेत." शक्तिपीठ महामार्ग हा मराठवाडा आणि राज्यातील सगळे दुष्काळी जिल्हे यांच्याकरता वरदान ठरणार आहे, असंही फडणवीस पुढे म्हणाले.

### राष्ट्रीय महामार्ग असतानाही शक्तिपीठचा आग्रह का?

सध्या अस्तित्वात असलेला राष्ट्रीय महामार्ग 166 हा रत्नागिरीपासून सोलापूरपर्यंत जातो. पुढे सोलापूर-धुळे या राष्ट्रीय महामार्गाहून तुळजापूरला जाता येतं आणि तुळजापूरहून पुढे थेट नागपूरपर्यंत जाण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग 361 आहे. शक्तिपीठ महामार्ग ज्या 12 जिल्ह्यांमधून जाणार आहे, त्यापैकी 8 जिल्ह्यांमधून हे दोन्ही राष्ट्रीय महामार्ग जातात.

शेतकरी नेते राजू शेट्टी म्हणतात, "नागपूर-रत्नागिरी या राष्ट्रीय महामार्गाला समांतर असणारा शक्तिपीठ महामार्ग हा पूर्णपणे अव्यवहार्य आहे. केंद्र आणि राज्य सरकार दोघांनी वेगवेगळ्या मार्गानं एवढी गुंतवणूक करून हे दोन्ही मार्ग नफ्यात चालणार आहेत का, याचा अहवाल जनतेसाठी खुला करावा."

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर गटातर्फे जन सुरक्षा विधेयका विरोधात आंदोलन




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर गट यांच्यातर्फे महाराष्ट्र सरकारने संविधानाने दिलेल्या हक्काचे पाय मल्ली करणारे जन सुरक्षा विधेयक तात्काळ मागे घ्यावे, संभाजी ब्रिगेड प्रदेश अध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ तीव्र निदर्शने करण्यात आली. या दरम्यान जर सरकारने आमच्या या मागणीवर विशेष भर दिला नाही तर यापेक्षा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकरवादी पक्षाने दिला आहे. या आंदोलनात रिपब्लिकन पक्षाचे कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्ष धर्मा वक्ते, महिला जिल्हाध्यक्षा शालिनी वाघ, ठाणे जिल्हाध्यक्ष मंगेश जाधव, कल्याण डोंबिवली युवक अध्यक्ष योगेश गायकवाड, डोंबिवली शहरअध्यक्ष राजू काकडे, कार्याध्यक्ष सुरेंद्र ठोके, बाजीराम माने, एड. मिलिंद साळवे, सुमित कनकुटे, अर्जुन केदार, अशोक गायकवाड, निलेश कांबळे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# कल्याण प्रेसक्लब अध्यक्षपदी आनंद मोरे तर कार्याध्यक्षपदी कुणाल म्हात्रे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण प्रेस क्लबला पंचवीस वर्ष पूर्ण झाल्याने रौप्य महोत्सवही सोहळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रेस क्लब च्या नविन कार्यकारणीची निवड करण्यात आली आहे. पत्रकारिता क्षेत्रात पत्रकार व अन्य समाजघटकासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या प्रेस क्लब कल्याणच्या अध्यक्षपदी लोकमतचे छायाचित्रकार आनंद मोरे यांची तर कार्याध्यक्षपदी पत्रकार कुणाल म्हात्रे यांनी निवड करण्यात आली आहे.

पत्रकारांना शासकीय कोट्यातून स्वतःची घरे व अन्य शासकीय योजना आणि सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात करणार असून प्रेस क्लबचा रौप्य महोत्सवही सोहळा संपन्न करण्यासाठी सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन कार्य करणार असल्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष आनंद मोरे यांनी या प्रसंगी सांगितले.

कल्याण डोंबिवली शहर परीसरात गेल्या पंचवीस वर्षा पासून नोंदणीकृत असलेली पत्रकार संघटना म्हणून कल्याण प्रेस क्लब कार्यरत आहे. प्रेस क्लब ची सर्वसाधारण सभा नुकतीच संपन्न झाली त्यात आगामी दोन वर्षासाठी विविध प्रकारची कार्यपद्धती पार पाडण्याकामी नविन कार्यकारणीची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यात अध्यक्ष म्हणून आनंद मोरे , कार्याध्यक्ष पत्रकार कुणाल म्हात्रे, सचिव म्हणून विष्णुकुमार चौधरी यांच्यासह उपाध्यक्ष म्हणून ज्येष्ठ पत्रकार रमेश दुधाळकर, अशोक वर्मा , खजिनदार सचिन सागरे तसेच कार्यकारणी सभासद म्हणून जेष्ठ पत्रकार नवीन भानुशाली, अतुल फडके , अशोक कांबळे, दत्ता भाठे , रवी चौधरी , तर प्रेस क्लबचे सल्लागार म्हणून जेष्ठ पत्रकार सुचिता करमरकर, दीपक जोशी आदींची सर्वानुमते नेमणूक करण्यात आली.

सभेच्या सुरवातीला मागील सभेचे इतिवृत्त व गेल्या वर्षाचा आर्थिक जमाखर्च ताळेबंद अध्यक्ष विष्णुकुमार चौधरी यांनी वाचून दाखविले व ते मंजूर करण्यात आले. शहर परिसरातील पत्रकाराना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा यासाठी कार्य करणे , प्रत्येक पत्रकारांचा जीवन विमा तसेच मेडीक्लेम , पोलीस यंत्रणा , महापालिका प्रशासक , प्रशासन व नागरिक यांच्यात संवाद साधण्यासाठी आणि नागरी समस्यांचे निवारण करण्यासाठी वार्तालाप , परिसंवाद आयोजित करणे आजच्या महाविद्यालयिन युवापिढीला सायबर सेल व सोशल मिडिया याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञांचे सेमिनार आयोजित करणे व पत्रकारिता क्षेत्रात नाविन्यपूर्ण कार्य करणार्यांनाचा विशेष सन्मान यासह अन्य उपक्रम कल्याण प्रेसच्या माध्यमातून व सर्व सहकारी सदस्यांच्या मदतीने राबविणार असल्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष आनंद मोरे यांनी सांगितले.

विविध राजकीय पक्षांच्या नेते मंडळी, महानगरपालिका पदाधिकारी आयुक्त व अन्य विभागाच्या अधिकाऱ्याचे सेमिनार मार्गदर्शन तसेच पत्रकाराच्या हिताच्या सेवा सुविधा व योजना राबविणे याबाबत उपस्थित सदस्यांनी सुचना केल्या प्रेस क्लब ला पंचवीस वर्ष पूर्ण होत असल्याने रौप्य महोत्सवही सोहळा कसा साजरा करण्यात यावा याबाबत अनेकांनी मत व्यक्त केली. तसेच सर्वांनी माझ्यावर विश्वास ठेवून पुन्हा अध्यक्ष पदी निवड केली याबाबत नवनिर्वाचित अध्यक्ष आनंद मोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# डोंबिवलीत भाजपात जोरदार इनकमिंग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** डोंबिवली भाजपमध्ये रविवारी काँग्रेस, मनसेच्या कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. तसेच विविध सामाजिक संस्थेमधील आणि विविध मंडळामधील कार्यकर्ते, शेकडो नागरिकांनी प्रवेश केला. भाजप प्रदेश अध्यक्ष आणि डोंबिवलीचे आमदार रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली हा प्रवेश करण्यात आला. यावेळी भाजप प्रदेश अध्यक्ष आणि डोंबिवलीचे आमदार रवींद्र चव्हाण यांनी सांगितले की येत्या 22 जुलै रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस असून या निम्मिताने संपूर्ण राज्यात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असून डोंबिवलीत दोन ठिकाणी रक्तदान शिबीराचे आयोजन




करण्यात आले आहे.

तर डोंबिवली मंडल अध्यक्ष पवन पाटील यांनी सांगितले की महाराष्ट्राच्या विकासासाठी भाजपा परिवार कटिबद्ध असून हे विविध पक्षांतील कार्यकर्त्यांना पटवून देण्यात यश येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपा परिवारामध्ये मोठ्या प्रमाणात प्रवेश होत आहेत, याचाच एक भाग म्हणून शेकडो कार्यकर्ते भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली भाजप परिवारात सामील झाले आहेत असे पाटील यांनी सांगितले. यावेळी कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, डोंबिवली मंडल अध्यक्ष पवन पाटील, मंडल अध्यक्षा प्रिया जोशी, मंडल अध्यक्ष मितेश पेणकर, समीर चिटणीस आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

काँग्रेस ब्लॉक अध्यक्ष शशिकांत(गणेश) चौधरी, महीला ब्लॉक अध्यक्ष गिता चौधरी, बाळा सावंत, मनसेचे सुभाष कदम, विजय शिंदे, तसेच डोंबिवली पश्चिमेमधील मनिष मोरे, राजेश भोईर, अनेक महिला मंडळं, सामाजिक मंडळ, समाजसेवक आणि सहकारी यांनी प्रवेश केला आहे.

# जिल्हा परिषद ग्रामपंचायत निवडणुकीसाठी भिवंडीत शिवसेनेची मोर्चेबांधणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी (शरद भसाळे)**

ठाणे जिल्हा परिषद व ग्रामपंचायतच्या निवडणुकीचे आरक्षण सोडत काढण्याची प्रक्रिया राज्य शासन आदेशानुसार महसूल विभागाने सुरू केल्याने काँग्रेस, भाजप, शिवसेनेने पक्ष, कार्यकर्तेचे बैठका सुरू केल्या आहेत. शिवसेना ठाणे ग्रामीण जिल्हाप्रमुख देवानंद यांनी यांनी सुद्धा निवडणूका लक्षात घेऊन कशेळी गांव येथील शिवसेना पक्ष कार्यालयात कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक मेळवा घेऊन भिवंडी शहर व ग्रामीण भागातील कार्यकर्तेना पद वाटप करीत मोर्चा बांधणी सुरू केली आहे.



भिवंडी तालुक्यातील कशेळी शिवसेना पक्ष कार्यालयात काल सायंकाळी आयोजित मेळावा कार्यक्रमास शिवसेना उपनेते निलेश सांबरे,अरूण पाटील, लोकसभा संपर्क प्रमुख मदन नाईक, भिवंडी पश्चिम शहरप्रमुख शाम पाटील, दिलीप नाईक यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते ठाणे ग्रामीण जिल्ह्यामध्ये होणाऱ्या आगामी जिल्हा परिषद ग्रामपंचायतच्या निवडणुका लक्षात घेऊन शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांनी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा व त्या अंतर्गत शिवसेना सदस्य मोहीम सुद्धा सुरू केली आहे.यावेळी झालेल्या मार्गदर्शीय भाषणात त्यांनी सांगितले कि आगामी निवडणुका लक्षात घेऊन सर्व पदाधिकारी व कार्यकर्तेनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करून पक्ष बांधणी सुरू करावी, आपसातील मतभेद विसरून कामाला सुरुवात करावी आणि ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेवर भगवा फडकविण्यासाठी सज्ज रहावे असे आवाहन देवानंद थळे यांनी यावेळी केले.

या प्रसंगी कोनगांव,पिंपळास, काल्हेर, कशेळी, अनगांव अशा विविध गावातील युवकांनी पक्षात प्रवेश केला यावेळी भिवंडी शहर व ग्रामीण भागातील सक्रीय पक्ष कार्यकर्तेना विविध पदावर नियुक्त करण्यात आले.

# एमएमआरडीएचे भविष्यातील संभाव्य धोके जनतेने लक्षात घ्यावे -सी आर.म्हात्रे यांचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)** MMRDA (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण) हे संस्थान मुंबई आणि परिसरातील,छोटी शहरे,गावचा विकास, नियोजन आणि पायाभूत सुविधांचा विस्तार यासाठी जबाबदार आहे.त्यांचे उदिष्ट शहरी करणला गती देण्याचे असले तरी या प्रकल्पाचे काही धोके पण संभवतात. याकडे डोळेझाक करता काम नये. विशेषतःग्रामीण ,किनारपट्टी,आणि काही ठिकाणी आदिवासी भागामध्ये सुद्धा. त्यामुळे भविष्यातील एम एम आर डी च संभाव्य धोके जनतेने लक्षात घ्यावे अशी आर्तहाक पेण तालुक्यातील वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी दिली आहे.

प्रथमतः स्थानिक शेतीचा ऱ्हास,जी जमीन प्रकल्प घेणार आहे ती सुपीक ,दर्जेदार,पाणथळ, ती शेतीयोग्य आहे. यामुळे खारेपाट विभागातील मासेमारी ,भातशेती संपून जाईल, ताटातील भात, मासे हे प्रमुख अन्न संपून जाईल.हा दीर्घकालीन परिणाम होईल साहजिकच हे उदरनिर्वाहाचे साधन संपल्यामुळे ही जनता नाईलाजास्तव शहराकडे रोजी रोटी साठी स्थलांतरित होताना दिसेल.

मोठ्याप्रमाणावर वृक्षतोड,जंगल असेल तर त्याची ती सफाई केली जाईल, जलस्त्रोत समुद्राने बळकावलेला असेल..जैव विविधता नष्ट होईल,छोटी छोटी माश्यांची प्रजाती नष्ट होईल, भविष्यात या परिसरात ते दिसणार नाहीत.पाणथळ पक्षी,प्राणी,नामशेष होतील.समुद्र किनारा आगरी,कोळी ,मराठी बांधवांनी जपून ठेवला आहे,त्याच बरोबर त्यांची संस्कृती रूढी ,परंपरा,सण,उत्सव,व्यवसाय नष्ट होतील ,कारण हे बांधव कधी एकत्र दिसणार नाहीत.

विकास हा बाह्य उद्योगासाठी असतो. स्थानिकांना प्रकल्पाची नवीन ध्येय धोरणे ,कायदे,परवाने, जाचक अटी असतील हे महत्वाचे. बेकायदेशीर व्यवहार,हस्तांतरण होत राहणार कारण स्थानिकांना योग्य ती माहिती नसल्याने एकदम अडचणी निर्माण होतील.

पायाभूत सुविधा,विकास,हा विशिष्ट भागापुरताच असेल तो मध्यवर्ती ठिकाणी दाखविण्यासाठी असेल...

उद्योग,पोर्ट, होतील पण स्थानिक पातळीवर, शाळा, मंदिरे, रुग्णालये, या सोयी अपूर्णच राहतात.विशेष म्हणजे मंदिरांची मालमत्ता त्याचे काय होणार याविषयी ग्रामस्थांना जागरूक रहावे लागेल. नाहीतर ज्याच्या हाती ससा तो पारधी ही गत होईल..अनेक mmrda प्रकल्प फक्त गुंतवणूक ,विकासक यांच्याच फायद्याचे असणारे दिसतात.

उद्योग,टाउनशिप छोटे मोठे फॉर्म हाऊस, यांना पाण्याची जास्त गरज लागते.आज जी पाणीटंचाई आहे त्यापेक्षा भयाण परिस्थिती ओढवेल.रस्ते,उद्योग,रेल्वे, टाउनशिप, रो हाऊस,,वीज,या सोयी जन सामन्यासाठी कमी आणि गुंतवणूक करण्यासाठी जास्त असते.

सेझ,नैना,काही छोटे मोठे प्रकल्प,यांनी ग्रामीण संस्कृती, भातशेती, मिठागरे, गोठा,पारंपरिक व्यवसाय, संपल्यानंतर, मोल मजुरी,सुरक्षा रक्षक,हॉटेल कामगार असे अस्थिर उपजिविकेचे साधन स्वीकारावा लागेल.हक्काची घरे, ओटे, अंगण,विहिरी,देवघर,ही संस्कृती यानंतर प्लॉट संस्कृतीमुळे लोप पावेल.माझी काळी माय (शेती) कोठे आहे,या आत्मग्लानीतील पिढ्या संपतात...

या MMRDA प्रकल्पात स्थानिक सहभाग कोठेही नसणार ,पॅकेज ,पुनर्वसन,नोकरीचे आमिष, फक्त आश्वासनच राहते.म्हणूनच सर्व मराठी,आगरी,कोळी बारा बलुतेदार यांचे पारंपरिक व्यवसाय नष्ट होतील.

यासाठी स्थानिक निस्वार्थी, तरुण बंधू,भगिनींनी,सखोल अभ्यास करून आपल्या ग्रामसभेची ताकद दाखवून दिली पाहिजे.ग्रामीण पर्यटन,मासेमारी संवर्धन, जतन करण्याचे प्रशिक्षण तरुणांनी घेतले पाहिजे.लोकांसमोर ,लेखन, सोशल मीडिया याचा वापर करून जागृती केली पाहिजे.

विकास म्हणजे विस्थापन नव्हे...

त्यामुळे भविष्यातील एम एम आर डी ए चा विचार करताना सर्व समाजाने या गोष्टीचा भान ठेवणे अत्यंत आवश्यक आहे अशी माहिती सी आर म्हात्रे यांनी दिली.



**सोमवार २१ जुलै २०२५**

| मेष | वृषभ | मिथुन | कर्क |
|---|---|---|---|
| कुठेतरी बाहेर जाऊ शकता, आर्थिक स्थिती मजबूत होईल. नियोजित महत्त्वाची कामे वेळेत पूर्ण होतील. | वैवाहिक जीवनात गोडवा राहील. एखादी चांगली बातमी मिळाल्या तुमचे मन दिवसभर प्रसन्न राहील. | आज तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल. कुटुंबासाठी थोडा आज वेळ काढावा लागेल. | आज काही कामात खूप व्यस्त असाल. इतरांचा कोणताही सल्ला तुमच्यासाठी फायदेशीर असेल. |
| **सिंह** | **कन्या** | **तूळ** | **वृश्चिक** |
| आज तुम्ही तुमच्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी काही नवीन योजना आणि गुंतवणूक कराल | नातेवाईकाच्या आगमनामुळे कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल. मिष्ठान्न भोजनाचा आस्वाद घ्याल. | आज आपण मित्रांसोबत फोनवर बोलण्यात वेळ घालवू नका. लव्हमेट एकत्र वेळ घालवतील. | दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. आज कुठेतरी अडकलेले पैसे परत मिळतील. प्रसन्नता दिसेल. |
| **धनु** | **मकर** | **कुम्भ** | **मीन** |
| विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे. व्यवसायाला पुढे नेण्यासाठी काही योजना कराव्या | आज धार्मिक आणि अध्यात्मिक कार्यात व्यस्त असाल. समर्पण आणि मेहनतीचे फळ मिळेल. | परिश्रमाचे खूपच चांगले परिणाम तुम्हाला मिळतील. यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल. | आज तुम्हाला कुटुंबाकडून पूर्ण सहकार्य मिळेलघरामध्ये धार्मिक कार्य करण्याचे बेत आखता येतील. |

## २१ जुलै दिनविशेष

- २०२२ : द्रौपदी मुर्मू - यांची भारताच्या १५ व्या राष्ट्राध्यक्षा म्हणून निवड.
- १९९४ : मराठी बखर वाङ्मयाचे अभ्यासक डॉ. र. वि. हेरवाडकर यांचे निधन.
- २००२ : मराठी चित्रकार गोपाळराव बळवंतराव कांबळे यांचे निधन.
- १८६३ : ज्योतिषगणि अभ्यासक, ग्रंथलेखक शंकर बाळकृष्ण दीक्षित यांचा जन्म



### मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त

# भाजप औषध विक्रेता विभागातर्फे राज्यभर सेवा सप्ताहाचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** भाजपच्या औषध विक्रेता विभागातर्फे येत्या मंगळवारपासून राज्यभर सेवा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने राज्यभर विविध भागात सेवाभावी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे, अशी माहिती भाजप औषध विक्रेता विभागाचे प्रदेशाध्यक्ष श्रीकांत दुबे यांनी दिली. या उपक्रमाचे नियोजन करण्यासाठी आयोजित प्रदेश कार्यालयातील बैठकीला प्रदेश समन्वयक अजित पारख, राज्याच्या विविध भागातील औषध विक्रेता संघटनांचे प्रतिनिधी डोंबिवलीतून नीलेश वाणी, इतर भागांमधून सुनील भंगाळे, अतुल अहिरे, दीपक कोठारी, गोपाळ गांधी उपस्थित होते.

सेवा सप्ताह तीन टप्प्यात राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात वृध्दाश्रम, अनाथ आश्रमातील नागरिक, मुलांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. यावेळी डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे त्यांना औषधे देण्यात येणार आहेत. रक्तदान शिबीरांचे आयोजन करून ते रक्त रक्तपेढ्यांना देण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात विकलांग मुलींनी तयार केलेल्या घरगुती वस्तुंना शहरी बाजारपेठ मिळवून देणे. या वस्तूंच्या माध्यमातून अशा मुली, त्यांच्या संस्थांना आर्थिक मदत होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जाणार आहेत. याशिवाय वृक्षारोपणाचे उपक्रम हाती घेऊन हे वृक्ष पूर्ण वाढ होईपर्यंत प्रत्येकाने दत्तक घ्यावेत याचे नियोजन केले गेले आहे.

अनेक वेळा शीत शवपेट्या वेळेवर उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे विभागवार अशा शीत शवपेट्यांची माहिती घेऊन संख्या कमी असलेल्या भागात त्या पेट्यांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जाणार आहेत, असे नीलेश वाणी यांनी सांगितले.

तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात राज्यात अधिक संख्येने औषध मिश्रक आहेत. काहींनी स्वताच्या क्षमतेने औषध विक्री दुकाने काढली आहेत. काहींची आर्थिक परिस्थिती नसल्याने ते बेरोजगार आहेत. काही औषध दुकानांमध्ये साहाय्यक म्हणून काम करत आहेत. अशा औषध मिश्रकांची बेरोजगार असलेली मोठी फळी राज्यात आहे. अशा बेरोजगार औषध मिश्रकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबई, पुणे येथे हे रोजगार मेळावे भरविण्याचे नियोजन सुरू आहे, असे प्रदेशाध्यक्ष दुबे यांनी सांगितले. विजय पाटील यांनी औषध मिश्रक रोजगार मेळाव्याची संकल्पना मांडली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे विविध समाजपयोगी उपक्रम आणि संस्था चालविल्या जातात. त्या संस्थांना या कालावधीत मोफत औषध देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# शटडाऊनमुळे उद्या ठाण्यातील पाणी पुरवठा बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
:: बातमीदार

**ठाणे (20) :** शहाड येथील अशुध्द जल उदंचन केंद्रावर मीटर बदलण्याचे काम व शहाड येथील अशुध्द जल उदंचन केंद्र येथे होत असलेली पाईपलाईन गळती बंद करणे व इतर आवश्यक कामे महावितरण कंपनीमार्फत करण्यात येणार आहे. सदरचे काम 24 तासांचा शटडाऊन घेऊन करण्यात येणार असल्याने ठाणे महानगरपालिकेला मे.स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा मंगळवार दिनांक 22/07/2025 रोजी सकाळी 9.00 ते बुधवार दिनांक 23/07/2025 रोजी सकाळी 9.00 वा. पर्यत बंद राहणार आहे.

तथापि ठाणे महानगर पालिकेच्या स्वतःच्या पाणी पुरवठा योजनेचे नियोजन करुन टप्पा टप्प्याने ठाणे शहरात एक वेळ पाणी पुरवठा सुरु ठेवण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने घोडबंदर रोड, पातलीपाडा, बाळकुम, ब्रम्हांड, पवारनगर, कोठारी कम्पाउंड, डोंगरीपाडा, वाघबीळ, इत्यादी ठिकाणाचा पाणी पुरवठा मंगळवार दि .22/07/2025 सकाळी 9.00 ते रात्री 9.00 वाजे पर्यंत बंद राहील व समतानगर, ऋतुपार्क, सिध्देश्वर, इंटरनिटी, जॉन्सन, जेल, साकेत, उथळसर, रेतीबंदर, कळव्याच्या व मुंब्राचा काही भाग मंगळवार दि. 22/07/2025 रोजी रात्री 9.00 ते सकाळी 9.00 वा. पर्यंत बंद राहील. अश्या रीतीने टप्पा टप्प्याने एक वेळ पाणी पुरवठा सुरु ठेवण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

वरील शटडाऊन मुळे पाणी पुरवठा पूर्व पदावर येईपर्यंत पुढील 1 ते 2 दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होण्याची शक्यता आहे. तरी नागरिकांनी पाण्याचा योग्य तो साठा करुन ठेवावा व ठाणे महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन पाणीपुरवठा विभागामार्फत करण्यात आले आहे.

### कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरेंवर

# प्रवाशांकडून टीकेची झोड



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** वाहतूक कोंडीमुळे रस्ते मार्गाने संध्याकाळच्या वेळेत कल्याण, डोंबिवली दिशेने पोहचणे प्रवाशांसमोर मोठे दिव्य असते. तासनतास वाहतुकीत अडकावे लागते. हा अनुभव गाठीशी असल्याने कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश गोवर्धन मोरे दोन दिवसापूर्वी विधीमंडळ अधिवेशन संपल्यावर रस्ते मार्गाने न येता सीएसएमटीहून लोकलने डोंबिवलीत आले. सामान्य प्रवाशांच्या अडचणी समजून घेण्यासाठी आमदार मोरे यांनी रेल्वेने प्रवास केला असल्याचे आमदार मोरे समर्थकांनी समाज माध्यमांवर छायाचित्रांसह आमदार मोरे यांची छायाचित्रे सामाईक केली. त्यामुळे नेहमीच धक्केबुक्के खात प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी आमदार मोरे यांना टीकेचे लक्ष्य केले.

आमदारांना लक्ष्य करणाऱ्यांमध्ये महिला, पुरूष प्रवाशांचा समावेश होता. संध्याकाळच्या वेळेत मुंबई, नवी मुंबईतून कल्याण, डोंबिवली दिशेने रस्ते मार्गाने येणे म्हणजे वाहतूक कोंडीचा मोठा त्रास असतो. मुंब्रा, पनवेल मार्ग, कल्याण शिळमार्ग, मुंबई नाशिक महामार्गावरील भिवंडी बाह्य वळण रस्ता - कोन ते दुर्गाडी रस्ता वाहनांनी गजबजून गेलेला असतो. मुंबई ते डोंबिवली, कल्याण या रस्ते मार्गाच्या दीड ते दोन तासाच्या अंतरासाठी अनेक वेळा तीन ते चार तास लागतात.

मुंबईत विधिमंडळ अधिवेशन सुरू होते. आमदार राजेश मोरे आपल्या विशेष गाडीने सकाळीच मुंबईत अधिवेशनासाठी जात होते. परंतु परताना त्यांना दररोज रस्ते मार्गातील वाहतुकीचा सामना करावा लागत होता. अधिवेशन संपण्याच्या काळात आमदार राजेश मोरे यांनी वाहन कोंडीला कंटाळून रेल्वे मार्गाने झटपट घरी जाऊन असा विचार करून सीएसएमटी येथून डोंबिवलीचा लोकलने प्रवास केला. सामान्य डब्यातून आमदार मोरे, समर्थक प्रवास करत होते. आमदार मोरे समर्थकांनी या प्रवासाचे मार्केटिंग करण्याचा विचार करून त्यांची रेल्वे प्रवासातील छायाचित्रे, प्रवाशांशी हितगुज करतानाची छायाचित्रे समाज माध्यमांवर प्रसारित केली.

आमदार मोरे यांची समाज माध्यमांवरील छायाचित्रे आणि मजकूर वाचून दररोज कल्याण, डोंबिवली भागातून सकाळच्या वेळेत लोकलने धक्कबुक्के खात जाणाऱ्या प्रवाशांचा तिळपापड झाला. त्यांनी आमदार मोरे यांना समाज माध्यमातून प्रत्युत्तर देताना, रात्रीच्या वेळेत गर्दी नसलेल्या डब्यातून प्रवास करण्यापेक्षा सकाळच्या वेळेत डोंबिवली रेल्वे स्थानकातून आठ ते अकरा वाजण्याच्या दरम्यानच्या लोकल पकडून दाखवा. त्यातून प्रवास करून दाखवा म्हणजे सामान्य प्रवासी कसा प्रवास करतो ते कळेल. महिला प्रवाशांची दुखे आपणास समजतील, केवळ देखाव्यापुरता प्रवास करून रेल्वे प्रवाशांच्या समस्या सुटणार नाहीत. त्यासाठी दररोज डोंबिवली ते मुंबई सकाळच्या वेळेत प्रवास करावा म्हणजे प्रवासी कशा मरणयातना भोगत आहेत ते कळेल.

# कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेच्या वतीने खासदार ॲड. उज्वल निकम यांचा सन्मान

- ॲड. उज्वल निकम यांचा खासदार झाल्यानंतर पहिलाच सत्कार
- वकील संरक्षण कायद्याची गरज अधोरेखित
- कल्याण न्यायालयासाठी स्वतंत्र इमारतीबाबत आश्वासन
- जागतिक मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ॲड. विलास नाईक यांचा सन्मान
- कार्यक्रमास वकील समाजाचा उत्स्फूर्त प्रतिसाद



> "मी आजही स्वतःला वकीलच समजतो. खासदार झालो असलो तरी माझं आत्मभान कोर्टाच्या पायऱ्यांवरच आहे." त्यांनी पुढे सांगितले की, "आजच्या काळात वकिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. वकील संरक्षण कायदा ही काळाची गरज आहे. मी स्वतः राहुरी (जि. नगर) येथील एका आढाव दांपत्य अधिवक्त्याच्या खून प्रकरणाचा खटला चालवत आहे, आणि या अनुभवातून मला जाणवलं की वकिलांसाठी सुरक्षिततेचं कवच असणं अत्यंत आवश्यक आहे." - खा. ॲड. उज्वल निकम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** भारतीय न्यायव्यवस्थेतील ख्यातनाम विशेष सरकारी वकील आणि अलीकडेच महाराष्ट्रातून राज्यसभेवर निवडून गेलेले खासदार ॲड. उज्वल निकम यांचा सत्कार सोहळा आज कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेच्या वतीने भव्यदिव्य उत्साहात पार पडला. हा सोहळा केवळ सन्मानापुरता न राहता, संपूर्ण वकिली समाजासाठी एक प्रेरणादायी पर्वणी ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात अध्यक्ष ॲड. प्रकाश रा. जगताप यांच्या अध्यक्षीय भाषणाने झाली. त्यांनी ॲड. उज्वल निकम यांच्या असामान्य न्यायकारकिर्दीचा मागोवा घेत त्यांच्या कार्यशैलीची आणि नीतिमत्तेची प्रशंसा केली. "ॲड. निकम हे न्याय, निष्ठा आणि राष्ट्रहित यांचे जिवंत प्रतीक आहेत. त्यांनी 1993 बॉम्बस्फोट, कसाब खटला, प्रशांत पुजारी, मनोहर नायक यांसारख्या महत्त्वपूर्ण खटल्यांमध्ये आरोपींना शिक्षा मिळवून दिली आणि न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास कायम राखला," असे अध्यक्ष ॲड. जगताप यांनी नमूद केले. तसेच, "निकम साहेबांचं संसदेत पोहोचणं हे संपूर्ण वकिली समाजासाठी अभिमानाची बाब असून, त्यांनी त्यांच्या संयम, शिस्त, आणि धारदार वक्तृत्वाने आम्हा सर्वांना प्रेरणा दिली आहे," असंही त्यांनी स्पष्ट केलं.

सत्काराला उत्तर देताना ॲड. उज्वल निकम साहेब भावूक होत म्हणाले – "मी आजही स्वतःला वकीलच समजतो. खासदार झालो असलो तरी माझं आत्मभान कोर्टाच्या पायऱ्यांवरच आहे." त्यांनी पुढे सांगितले की, "आजच्या काळात वकिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. वकील संरक्षण कायदा ही काळाची गरज आहे. मी स्वतः राहुरी (जि. नगर) येथील एका आढाव दांपत्य अधिवक्त्याच्या खून प्रकरणाचा खटला चालवत आहे, आणि या अनुभवातून मला जाणवलं की वकिलांसाठी सुरक्षिततेचं कवच असणं अत्यंत आवश्यक आहे." तसेच त्यांनी कल्याण न्यायालयासाठी स्वतंत्र इमारत उभी राहावी यासाठी केंद्र सरकारकडून आवश्यक पाठपुरावा करण्याचं ठाम आश्वासन दिलं.

**ॲड. विलास नाईक यांचाही गौरव**

याच कार्यक्रमात अलिबाग येथील ज्येष्ठ वकील आणि नुकतेच निवड झालेले 'जागतिक मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष' ॲड. विलास नाईक यांचाही ॲड. उज्वल निकम यांच्या हस्ते शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. साहित्य आणि वकिली क्षेत्राची सुसंवादात्मक सांगड घालणाऱ्या ॲड. नाईक यांच्या कार्याला संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या रूपाने मिळालेली मान्यता ही संपूर्ण वकिली समाजासाठी अभिमानास्पद आहे, असा सूर उपस्थितांमध्ये दिसून आला.

कार्यक्रमास संघटनेचे वरिष्ठ वकील सदस्य, महिला अधिवक्त्या, नवोदित वकील बांधव आणि संपूर्ण कार्यकारिणी उत्स्फूर्तपणे उपस्थित होती. समारोप करताना अध्यक्ष ॲड. प्रकाश जगताप यांनी सांगितलं. "या सत्कारामुळे आम्ही केवळ व्यक्तींचा गौरव केला नाही, तर वकिलीच्या मूल्यांचं पुनर्पुष्टीकरण केलं आहे. उज्वल निकम आणि विलास नाईक हे आमच्यासारख्या नव्या पिढीच्या वकिलांसाठी दीपस्तंभ ठरावेत." अशा शब्दांत ॲड. प्रकाश जगताप यांनी कार्यक्रमाचा सामारोप केला.

# शेतकऱ्यांनी टाकून दिलेल्या नापिक - ओसाड जमिनीवर फुलले कष्टाचे अंकुर

**आदिवासी बांधवांनी चिरनेर परिसरातील ओसाड शेत जमिनीत भातरोपांची लागवड करून या ओसाड जमिनी लागवडीखाली आणल्या आहेत.**



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** औद्योगिक आणि सातत्याने होणारी नापिकीमुळे शेतकऱ्यांनी ओसाड ठेवलेल्या जमिनीवर आदिवासींनी भात लागवड करीत शेतीचे महत्व सिद्ध केले आहे. उरण मधील वाढती मजुरी, मजुरांचा अभाव आणि निसर्गाच्या अनियमितपणा यामुळे बहुतांशी शेतकऱ्यांनी शेतीकडे दुर्लक्ष केले आहे. यात तरुणांना शेतीची ओढ नाही. त्यामुळे या जमिनी ओसाड पडल्या होत्या. मात्र आदिवासी बांधवांनी चिरनेर परिसरातील ओसाड शेत जमिनीत भातरोपांची लागवड करून या ओसाड जमिनी लागवडीखाली आणल्या आहेत.

पोटाची भूक भागविणाऱ्या काळ्या आईला महत्व देऊन, या ओसाड जमिनीत भात लागवड करून चिरनेर परिसरातील आदिवासी बांधवांनी समाजातील शेतकऱ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. वर्षाचे बारा महिने मोलमजुरी करून पोटाची खळगी भरणारा हा समाज अलीकडे विकासाच्या मुख्य प्रवाहात येत असून, त्यांना अन्नाचे महत्त्व काय असते हे समजले आहे. दरम्यान चाणजे ता. उरण येथील शेतकरी ज्ञानेश्वर शांताराम म्हात्रे यांच्या शेतावर आदिवासी बांधवांच्या कृतीतून, पट्टा पद्धतीने भात लागवड करून, आदिवासी बांधवांना तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली उरणच्या कृषी अधिकाऱ्यांनी पट्टा पद्धतीच्या लावणीचे व चारसूत्री लावणी पद्धतीचे महत्त्व पटवून दिले आहे.

# गणेश मूर्तिकारांकडून सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांचा सत्कार




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी) :** प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीवर आणलेली बंदी शिथिल केल्याबद्दल राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री तथा रायगडचे संपर्कमंत्री ना. आशिष शेलार याचा रायगड जिल्ह्यातील समस्त मूर्तिकाकारां तर्फे पेण येथे सत्कार सोहळा हमरापूर विभाग गणेश उत्कर्ष मंडळातर्फे आयोजित करण्यात आला होता.यावेळी मंत्री आशिष शेलार यांनी उपस्थित जिल्ह्यातील मूर्तिकार यांना संबोधताना सांगितले की सण उत्सव नेहमी साजरे करण्यासाठी भाजप पक्ष मूर्तिकार जनतेच्या पाठी असल्याचे सांगितले.

यावेळी खासदार धैर्यशील पाटील ,आमदार रवींद्र पाटील,आमदार प्रशांत ठाकूर,आमदार महेश बालदी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष नीलिमा पाटील माजी जिल्हा परिषद सदस्य वैकुंठ पाटील,प्रभाकर म्हात्रे,डीबी पाटील, माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील,माजी मिलिंद पाटील, शर्मिला पाटील चित्रा पाटील, स्मिता पाटील आजी माजी सरपंच व ग्रामस्थ आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना वैकुंठ पाटील यांनी सांगितले कीआर्थिक संकटात सापडलेल्या मूर्तिकारांना न्याय देण्याचे काम राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार साहेबांनी केले आहे.पर्यावरण विषय आणि मूर्तिकारांची जी काही समस्या आहे त्याला एक नाजूक समतोल निर्माण झाला परंतु या सर्व बाजूंनी योग्य विचार करून पाहिलं आणि तज्ञांच्या सोबत बैठक घेतली आणि त्या बैठकीनंतर त्यांनी आपल्या हजारो कामगारांना न्याय मिळवून दिला असेही सांगितले. यावेळी खासदार धैर्यशील पाटील, आमदार रवींद्र पाटील, आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपले विचार मांडताना मंत्री आशिष शेलार यांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अध्यक्ष जयेश पाटील, कुणाल पाटील,नितीन मोकल,गोपिनाथ मोकल,सतीश पाटील,आजी माजी सरपंच उपसरपंच ग्रामस्थ होते.

# वसईतील नद्या - धबधब्यांवर कडेकोट पोलीस बंदोबस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** नुकताच नायगाव चिंचोटी येथील धबधब्याच्या डोहात मुंबईच्या गोरेगाव येथील दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली होती. अशा घटना रोखण्यासाठी शनिवार आणि रविवारी नायगाव पोलिसांनी पर्यटन स्थळाच्या दिशेने जाणाऱ्या मार्गांवर विशेष पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. त्यांच्याद्वारे येणाऱ्या पर्यटकांना पुन्हा माघारी पाठविले जात आहे.

वसई तालुक्याचा परिसर निसर्गरम्य असा परिसर असून या भागात समुद्र किनारे, छोटेमोठे धबधबे आहेत. पावसाळा सुरू झाल्याने नद्या, धबधबे प्रवाहित झाले आहेत. त्यामुळे शनिवार आणि रविवार अशा विकेंडला मोठ्या संख्येने पर्यटन ही या ठिकाणी पर्यटनासाठी येऊ लागले आहे. मात्र काही अतिहौशी पर्यटक मद्यपान करून पाण्याच्या प्रवाहात जाणे, स्टंट बाजी करणे, उंच ठिकाणाहून पाण्यात उडी मारणे, तर काहींना ठिकाणांची माहिती नसताना ही पाण्यात उतरतात त्यामुळे बुडण्याच्या घटना, प्रवाहात अडकून पडण्याच्या घटना घडतात. अशा घटना रोखण्यासाठी पोलीस उपायुक्तांनी नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) (२) मनाई आदेश लागू केले आहेत. याशिवाय सूचना फलक ही लावण्यात आले आहेत.

मात्र तरी सुद्धा बंदी झुगारून व छुप्या मार्गाने वाट काढत पर्यटन स्थळी जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. नुकताच मुंबईच्या गोरेगाव येथून सहा तरुणांचा गट १४ जुलै रोजी चिंचोटी धबधब्याच्या ठिकाणी पर्यटनासाठी आला होता यातील दोन तरुणांना पाण्याचा अंदाज न आल्याने डोहात बुडून त्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी नायगाव पोलिसांनी सतर्क ता राखत चिंचोटी, देवकुंडी कामण, यासह अन्य भागातील नद्या व धबधबे अशा ठिकाणी कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे.

# पेण : गटाराचे काम सुरू असताना गॅस पाईपलाईन फुटल्याने आगीचा भडका





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** शहरामध्ये अनेक ठिकाणी महानगर एलपीजी गॅस पाईपलाईनचे काम चालू आहे. शहराच्या प्रत्येक गल्लीतील रस्ते खोदून पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. पेण आगरी समाज भवनकडे जाणा-या व नव्याने बांधकाम करीत असलेल्या रिंग रोड लगतच आर.सी. इलेक्ट्रॉनिक्स येथे पेण नरपरिषदेच्या गटाराचे बांधकाम सुरु असताना माती काढते वेळी जेसीबीचे टोक लागून येथे टाकलेली भूमीगत गॅस पाईप लाईन फुटल्याने पाईपमधील गॅस बाहेर येऊन हवेतील ऑक्सिजनच्या झालेल्या संपर्कामुळे पेट घेतला आणि आगीचे लोळ बाहेर पडू लागले. पेण नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचले आणि ड्राय पावडरचा फवारा मारुन आग आटोक्यात आणली. या बाजूचा वाहतूकीचा रस्ता बंद असल्यामुळे कोणत्याही प्रकारचा अनर्थ घडला नाहीतातडीने होणारा गॅस पुरवठा बंद केला. अर्धा तासानंतर सर्व सोपस्कार पूर्ण झाले आणि मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी जातीने लक्ष केंद्रित करीत संबधीत यंत्रणेनी व नगर परिषद कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवली अणि सर्वानी सुटकेचा निःश्वास सोडला. या घटने बाबत महानगर गॅस वितरण करणारे अधिकारी वर्गाची तातडीची बैठक मुख्याधिकारी यांनी बोलावली असून सुरक्षा प्रबंधाबाबत ते या बैठकीत माहिती देणार असल्याचे मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी सांगितले.

# वसई तहसील कार्यालयात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची तपासणी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसईः** आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून तयारीला सुरुवात झाली असून, गुरुवारी वसई तहसील कार्यालयात निवडणूक प्रक्रियेसाठी अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) तपासणी व पडताळणी करण्यात आली. वसईत आगामी जिल्हा परिषद व ग्रामपंचायतच्या निवडणुका लागणार आहेत. या निवडणुकीची तयारी म्हणून या मशीन पडताळणी करण्यात आल्या. यावेळी ईव्हीएममध्ये दोन युनिट कार्यान्वित असल्याची खात्री करण्यात आली.





दैनिक **जीवनदीप वार्ता**

ठाणे ■ सोमवार ■ २१ जुलै २०२५

jeevandeepvartanews2020@gmail.com




# ठाण्यातील मालमत्तेच्या दरात गेल्या तीन वर्षांत ३६ टक्क्यांनी वाढ!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेशातील एक महत्त्वपूर्ण रिअल इस्टेट हॉटस्पॉट म्हणून ठाणे वेगाने उदयास येत आहे. मोठे पायाभूत सुविधा गुंतवणूक, वाढती घरांची मागणी आणि उच्च श्रेणीतील विकासकांची वाढती उपस्थिती यामुळे हे शक्य झाले आहे. ॲनारॉक (ANAROCK) च्या जुलै २०२५ च्या अहवालानुसार, गेल्या तीन वर्षांत शहरांतील मालमत्तांच्या किमतीत तब्बल ३६ टक्के वाढ झाली आहे. रिअल इस्टेट क्षेत्राला ५९,००० कोटी रुपयांच्या आगामी पायाभूत सुविधा प्रकल्पांचा मोठा फायदा झाला आहे, ज्यात नवीन मेट्रो लाईन्स, ठाणे-बोरिवली बोगदा आणि ठाणे-नवी मुंबई उन्नत कॉरिडॉर यांचा समावेश आहे. शहराचे धोरणात्मक स्थान आणि मुंबईच्या प्रमुख व्यावसायिक केंद्रांशी वाढलेली कनेक्टिव्हिटी यामुळे खरेदीदारांच्या पसंतीमध्ये ठाण्याकडे लक्षणीय बदल झाला आहे, असे अहवालात म्हटले आहे. या अहवालात असेही सूचित केले आहे की, दोन बेडरूम-हॉल-किचन (2BHK) युनिट्स घरांच्या पुरवठ्यावर वर्चस्व गाजवत आहेत, जे प्रामुख्याने लहान कुटुंबे आणि तरुण व्यावसायिकांच्या गरजा पूर्ण करतात. विशेषतः, 2BHK अपार्टमेंट्स एकूण पुरवठ्याच्या ४५ टक्के आहेत, त्यापाठोपाठ 1BHKs ४२ टक्के आहेत. सर्वाधिक मागणी असलेली किंमत श्रेणी ८० लाख ते १.६ कोटी दरम्यान आहे, जे शहराच्या निवासी पुरवठ्याच्या ४४ टक्के आहे.

# नवीमुंबईत पोलिसावर हल्ला सीबीडी पोलिसांकडून एकाला अटक

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**नवी मुंबई, ता. २० (वार्ताहर)**

बारच्या व्यवस्थापकाला मारहाण केल्याने पोलिस ठाण्यात आणलेल्या एका तरुणाने पोलिसालाच हातातील स्टीलच्या काठीने मारहाण करून दुखापत केल्याची घटना शुक्रवारी (ता. १८) पहाटे सीबीडी पोलिस ठाण्यात घडली. सतबिरसिंग दलजितसिंग संधू (३१) असे मारहाण करणाऱ्याचे नाव असून सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी सीबीडी पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल करून ताब्यात घेतले आहे.

या घटनेत जखमी झालेल्या पोलिस अंमलदाराचे नाव अनिकेत घाडगे असे असून ते सीबीडी पोलिस ठाण्यात कार्यरत आहेत. तर, सतबिरसिंग संधू सीबीडी सेक्टर तीनमध्ये राहण्यास आहे. गुरुवारी (ता. १७) पोलिस नाईक अनिकेत घाडगे हे रात्रपाळीवर ठाणे अंमलदार मदतनीस म्हणून कर्तव्यावर होते. या वेळी सतबिरसिंग संधू याने सीबीडी सेक्टर-११ मधील मॅग्रम बारच्या व्यवस्थापकाशी माचिस मागण्याच्या कारणावरून वाद घातला आणि त्याला मारहाण केली.

या घटनेनंतर मध्यरात्रीच्या सुमारास मॅग्रम बारमध्ये बिट मार्शल पोहोचले होते. मध्यरात्री दीडच्या सुमारास संधूला ताब्यात घेऊन सीबीडी पोलिस ठाण्यात आणल्यावर तो घाडगेंच्या अंगावर धावून गेला आणि जबर मारहाण केली.

# जे. जे. च्या बालरोग विभागातील डॉक्टरांचे काम बंद आंदोलन

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**मुंबई, ता. २० :** जे. जे. रुग्णालयातील अंतिम वर्षाच्या निवासी डॉक्टरने १६ जुलै रोजी झोपेच्या गोळ्या घेत आत्महत्येचा प्रयत्न केला होता. वरिष्ठांच्या दुर्लक्षामुळे हा प्रकार झाल्याचा आरोप करीत बालरोग विभागातील डॉक्टरांनी काम बंद आंदोलन केले होते.

एका तृतीय वर्षीय महिला डॉक्टरने विभागप्रमुखाला एक भावनिक संदेश केला. दरम्यान, संदेश पाहूनही विभागप्रमुखाने त्याला उत्तर दिले नाही. त्या मुलीला समुपदेशन करून आत्महत्येच्या प्रयत्नापासून दूर ठेवता आले असते. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या, त्यांचा मानसिक ताण वाढवणाऱ्या विभागप्रमुखावर कारवाई करा, या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. आत्महत्येचा प्रयत्न करण्यापूर्वी लिहिलेल्या पत्रात बालरोग विभागाच्या प्रमुखाचे नाव लिहिले आहे. मात्र तृतीय वर्षातील महिला डॉक्टर मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांसाठी औषधे घेत होती, असे रुग्णालयातील एका वरिष्ठ डॉक्टराने स्पष्ट केले आहे.

विभागप्रमुखाविरोधात विभागातील ४२ विद्यार्थ्यांनी स्वाक्षरी करीत विविध तक्रारी समितीसमोर मांडल्या आहेत. त्यामुळे तातडीने दोन समित्या गठित करण्यात आल्या असून, सात दिवसांत प्राथमिक अहवाल सादर केला जाणार आहे.

जे. जे. विभागातील बालरोग विभागात शिकणाऱ्या डॉक्टरांनी आंदोलन सुरू केले. यात मार्ड संघटनेनेदेखील त्यांना पाठिंबा दिला. आंदोलनावेळी विभागप्रमुख देत असलेल्या धमक्यांचा त्यांनी पाढा वाचला. मात्र वरिष्ठांकडे तक्रार करण्यामागे विभागप्रमुख नापास करतील आणि शिक्षणावर त्याचा परिणाम होईल, अशी भीती विद्यार्थ्यांना असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे विभागप्रमुख डॉक्टर वर्मा यांची बदली करा, अशी मागणी डॉक्टर करीत आहेत. दरम्यान, डॉ. बेला वर्मा यांनी आरोप फेटाळले आहेत.

# बदलापुरातील विजेच्या लपंडावाला लवकरच पूर्णविराम

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**दि. 20/ शहर प्रतिनिधी**

**बदलापूर :** गेल्या काही महिन्यांपासून बदलापुरात सुरू असलेला विजेचा लपंडाव लवकरच संपण्याची चिन्हे आहेत. यावर उपाय म्हणून महावितरणने बदलापूरसाठी मोरीवली उपकेंद्रातून स्वतंत्र वाहिनी टाकण्याचे काम सुरू केले असून त्यामुळे बदलापुरात सुरू असलेला विजेचा लपंडाव संपेल, अशी अपेक्षा आहे.

बदलापुरात गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या विजेच्या लपंडावाने नागरिक हैराण आहेत. बदलापुरातील भाजपच्या पदाधिकाऱ्यांनीही या मुद्द्यावर महावितरण अधिकाऱ्यांना धारेवर धरले होते. मात्र त्यानंतरही परिस्थिती जैसे थे होती. त्यामुळे आमदार किसन कथोरे यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही समस्या मांडली होती. त्याची गांभीर्याने दखल घेत मुख्यमंत्र्यांनी वारंवार खंडित होत असलेल्या वीजपुरवठ्यावर उपाय योजना करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार महावितरणकडून अंबरनाथच्या मोरीवली उपकेंद्रातून बदलापूरपर्यंत नवी लाइन टाकण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. तब्बल १६ किलोमीटर लांबीची केबल आणि ४० ट्रान्सफॉर्मर यासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

पुढील महिनाभरात हे काम पूर्ण होऊन बदलापुरातील विजेचा लपंडाव संपणे अपेक्षित आहे. नुकतेच भाजपचे बदलापूर पूर्व शहराध्यक्ष रमेश सोळसे, ठाणे जिल्हा महामंत्री संभाजी शिंदे, माजी शहराध्यक्ष शरद तेली आदींनी महावितरणच्या अधिकाऱ्यांसह या कामाची पाहणी केली.

# ॲप आधारित कॅब चालकांचा बुधवारपासून पुन्हा संपाचा इशारा

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**मुंबई :** ॲप आधारित कॅब चालकांच्या संपाला सरकारकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. दैनंदिन उत्पन्नावर घर चालवणाऱ्या चालकांना संपाची झळ बसू लागल्याने अप आधारित रिक्षा, टॅक्सी, कॅब चालकांनी चार दिवसांपासून सुरू असलेला संप मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. मंगळवारपर्यंत आरटीओने सकारात्मक निर्णय न घेतल्यास, बुधवारपासून पुन्हा संप सुरू करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र कामगार सभा या संघटनेद्वारे दिला आहे.

ओला, उबरसारख्या अ◌ॅप आधारित टॅक्सी चालकांना प्रतिकिमी ८ ते १२ रुपये भाडे दिले जात होते. त्यामुळे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने (आरटीओ) निश्चित केलेले दर सर्व अप आधारित सेवेसाठी लागू केले जावे, अशी मागणी राज्यभरातील चालकांद्वारे केली जात होती. यासाठी सीएसएमटीजवळील आझाद मैदानात संप आणि अनिश्चित कालावधीसाठी उपोषण सुरू होते. परंतु, या संपाला संमिश्र प्रतिसाद मागण्यांबाबत आरटीओ विचार करून मंगळवारपर्यंत निर्णय घेणार आहे. आरटीओने मागण्यांबाबत विचार करण्यासाठी मंगळवारपर्यंत वेळ मागितला.

मात्र, चालक वर्गाच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी त्याला गाडी चालवणे आवश्यक आहे. त्याच्या गाडीचे चाक थांबल्यास, त्यांचे घर रस्त्यावर येईल. त्यामुळे संप मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु, मंगळवारी मागण्या पूर्ण न झाल्यास पुन्हा संप सुरू केला जाईल, असा इशारा दिला आहे.






# आमदार कथोरे यांच्या हस्ते न्हावे ग्रामपंचायतीच्या नाविन्यपूर्ण कार्यालयाचे लोकार्पण!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड (दिलीप पवार) :** तालुक्यातील न्हावे येथिल पंचविस लाख रूपये निधी खर्च करून अत्यंत देखण्या व सर्व सोयिंनीयुक्त अशा ग्रामपंचायत कार्यालयाचे लोकार्पण आज मुरबाड विधानसभेचे लोकप्रिय आमदार किसन कथोरेंच्या हस्ते करण्यात आले.

न्हावे ग्रामपंचायतचे तरूण तडफदार सरपंच जगदिश हिंदुराव व त्यांच्या सहकारी टिमने आमदार कथोरेंच्या सहकार्याने अत्यंत सुरेख व अप्रतिम बांधकाम करून हे कार्यालय उभारले आहे. यामध्ये सरपंचासाठी स्वतंत्र वातानुकूलित केबिन , ग्रामसेवक कार्यालय, छोटे व मोठे असे दोन सभागृह त्याच बरोबर देखणी अशी अंतर्गत सजावट, बाहेरच्या बाजुने केलेले गार्डन, ग्रामसभेसाठी वरचे सभागृह, शौचालय अशा सर्व सोयी या कार्यालयात असून ठाणे जिल्ह्यात एक नाविन्यपूर्ण रोल मॉडेल उभे राहिले असल्याची प्रतिक्रिया यावेळी आमदार किसन कथोरे यांनी दिली असून न्हावे ग्रामपंचायतचे सरपंच जगदिश हिंदुराव ,उपसरपंच शशांक हिंदुराव व सदस्यांचे कौतुक केले आहे. तर सरपंच जगदिश हिंदुराव यांनी दीड वर्षा पासून गावात आमदार कथोरेंच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत कार्यालया बरोबरच जल जीवन मिशन योजना, गावातील अंतर्गत रस्ते, दलीत वस्तीची कामे,जनमन मधून घरकुले, अंगणवाडी अशी विविध कामे मार्गी लागली असल्याचे सांगितले.

या वास्तुच्या लोकार्पणासाठी सिडकोचे मा.अध्यक्ष प्रमोद हिंदुराव, जि. प. मा. सदस्य उल्हास बांगर, टि. डी. सी. बँकेचे संचालक राजेश पाटील, नितीन मोहपे, सुरेश बांगर, रिपाई तालुका अध्यक्ष दिनेश उघडे, प्रतिक हिंदुराव, कान्होळच्या सरपंच सौ.रेश्मा घरत, सासणे सरपंच सौ.खरेताई, सुभाष देसले यांच्या सह मोठया संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.तर यावेळी माऊली सुरसंध्या कान्होळ येथिल भजन मंडळाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

# पालघर जिल्ह्यातील आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांना 'मन रे' फाउंडेशनचा आसरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर, ता. २० (बातमीदार)**

विद्यार्थ्यांना शिकण्याची इच्छा असते, मात्र आर्थिक अडचणीमुळे शैक्षणिक शुल्क भरता येत नाही. पालघर जिल्ह्यातील अशा मुलांसाठी मन रे फाउंडेशन आशेचा किरण ठरला आहे. नुकतीच त्यांनी जिल्ह्यातील शंभर विद्यार्थ्यांना सुमारे ६२ लाख रुपयांची शैक्षणिक मदत केली आहे. व पुढील उच्च शिक्षणासाठी लागणारी मदतही फाउंडेशन करेल, तुम्ही शिकत राहा, असा विश्वास फाउंडेशनच्या अध्यक्षा मानसी दलाल यांनी विद्यार्थ्यांना दिला.

मन रे फाउंडेशन गेल्या चार वर्षांपासून पालघर जिल्ह्यातील खेडापाड्यातील विशेषतः जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना दरवर्षी शैक्षणिक साहित्य देते. त्यांच्या या उपक्रमामुळे जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांतील विद्यार्थीसंख्येत वाढ झाल्याचे शिक्षकांनी दलाल यांना सांगितले, मात्र या वस्तू देताना विद्यार्थ्यांची ७५ टक्क्यांपेक्षा जास्त हजेरी आवश्यक असल्याचा नियम त्यांनी केला आहे. आठवीपासून विद्यार्थिनी आपलं शिक्षण सोडत असल्याचे त्यांच्या लक्षात आल्यावर यामागचं कारण शोधलं असता अनेकांना मासिक पाळीदरम्यान सॅनिटरी पॅड नसल्याने मुली शाळेत येणे टाळतात, असे समोर आले. याकरिता त्यांनी मुलींना वर्षभराचे किट दिले, असेही दलाल यांनी सांगितले. मन रे फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी २०२० पासून पालघर जिल्ह्यातील गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्यास सुरुवात केली. सहा हजारांपासून ते साधारण दोन ते अडीच लाख रुपयापर्यंतचे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क त्यांच्या संस्थेमार्फत भरले जाते.

पालघर येथील जेनेसिस औद्योगिक वसाहतीमध्ये विद्यार्थ्यांना धनादेश वितरणाचा कार्यक्रम पार पडला. या वेळी मन रे फाउंडेशनच्या अध्यक्षा मानसी दलाल, गौरव दलाल, उमरोळीचे सरपंच प्रभाकर, पाटील, दांडेकर महाविद्यालयाचे क्रीडा संचालक संतोष चुरी, राजेशमणी त्रिपाठी व विद्यार्थी त्यांचे पालक आदी उपस्थित होते.

# बेताल वक्तव्य करणाऱ्या नेत्यांना प्रदेशाध्यक्षांची तंबी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
:: बातमीदार

राज्यातील विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन पार पडले. मात्र, हे अधिवेशन सभागृहाबाहेरील विविध कारनाम्यांनी गाजले. गेल्या काही दिवसापासून बेताल वक्तव्य करणाऱ्या नेतेमंडळीमुळे सत्ताधारी महायुती अडचणीत आली आहे. एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे मंत्री, भाजपचे मंत्री यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याने ऐन अधिवेशनकाळात अडचणीत भर पडली आहे. त्यातच भाजपचे मंत्री गोपीचंद पडळकर आणि माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यात विधानसभेच्या गॅलरीत हाणामारी झाली.

विधिमंडळाच्या इतिहासात पहिल्यांदाच असा प्रकार घडल्याने मोठी नाचक्की झाली आहे. त्यामुळे सर्वच नेत्यांची या कृत्यामुळे बदनामी झाली आहे. विशेषतः भाजपची प्रतिमा शिस्तबद्ध पक्षच अशी राहिली आहे. त्यामुळेच बेताल वक्तव्य करणाऱ्या नितेश राणे, गोपीचंद पडळकरांना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी समज दिली आहे. त्यामुळे थेट प्रदेशाध्यक्षांनीच कान टोचल्यानंतर भाजपमधील या वाचळवीरांना चाप बसणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दुसरीकडे प्रदेशाध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतर रवींद्र चव्हाण यांनी भाजपमधील बेताल वक्तव्य करणाऱ्या नेत्यांना समज दिली आहे. लोकप्रतिनिधींनी बोलताना जपून शब्द वापरले पाहिजेत. टीआरपीच्या शर्यतीत



नेत्यांनी अडकू नये अशी तंबीच त्यांनी दिली आहे.

सत्ताधारी पक्षातल्या अनेक नेत्यांच्या वक्तव्यांमुळे वादंग निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वी जाहीर सभेत बोलताना भाजप नेते गोपीचंद पडळकरांची जीभ घसरली होती. मंत्री नितेश राणे आणि गोपीचंद पडळकर हे कायम आपल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे चर्चेत राहतात. त्यामुळेच भाजपमधल्या या वादग्रस्त नेत्यांना नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना समज दिली आहे.

पडळकरांनी पवार कुटुंबाबाबत बोलताना वादग्रस्त वक्तव्य केले होते. भाजप नेते आणि मंत्री नितेश राणेही कायमच वादाच्या केंद्रस्थानी असतात. नितेश राणेंच्या अनेक वक्तव्यांनी आतापर्यंत वाद झालेले आहेत. राणेंच्या वक्तव्यानंतर भाजपचीही अनेकदा अडचण झाली आहे. अशा वाचाळवीर नेत्यांमुळे भाजपची अडचण झाल्याचीच कबुली अप्रत्यक्षपणे रवींद्र चव्हाण यांनी दिली आहे.

या वादग्रस्त वक्तव्याने भाजपची प्रतिमा मालिन होत आहे. त्यामुळेच वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या या दोन नेत्यांना चव्हाण यांनी समज दिली आहे. त्यामुळे थेट प्रदेशाध्यक्षांनीच कान टोचले आहेत. त्यामुळे येत्या काळात भाजपमधील या वाचळवीरांना चाप बसणार का, याकडे लक्ष लागले आहे.

# कोसले गावातील शेतकऱ्याला दिल्लीच्या ध्वजारोहण सोहळ्याचे निमंत्रण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा, ता. २०** गावोगावी, खडोपाड्यात बर्फाचे गोळे विकून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारा एक सर्वसामान्य माणूस शेतात आमूलाग्र बदल करण्यासाठी झटतो. जिद्द, चिकाटी, अपार कष्ट करण्याची तयारी, प्रबळ महत्त्वाकांक्षा आणि प्रचंड आत्मविश्वास यांच्या जोरावर आधुनिक शेतीवर भर देतो. तितक्याच तत्परतेने राज्य सरकार व जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून या शेतकऱ्याला विविध योजना, साह्य, मार्गदर्शन, मदत मिळते. यांच्याच जोरावर हा बर्फाचे गोळे विकणारा सर्वसामान्य माणूस तालुका, जिल्हा, राज्य पातळीवरील अनेक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार मिळवतो, इतकेच नव्हे तर राजधानी दिल्लीत होणाऱ्या ध्वजारोहण सोहळ्यास उपस्थित राहण्याचा मान मिळतो, ही ठाणे जिल्ह्यासाठी अभिमानास्पद बाब आहे. ही यशोगाथा कल्याण तालुक्यातील कोसले गावातील श्रीराम विठ्ठल पाडवी या शेतकऱ्याची आहे.

कल्याण तालुक्यातील कोसले या छोट्याशा ग्रामीण भागात विठ्ठल पाडवी हे आठ एकर शेतीमध्ये (साडेतीन एकर माळरान) पावसाळ्यात थोड्या शेतात भातलागवड करत; मात्र त्यातून फारसे उत्पन्न मिळत नसल्याने त्यांचा मुलगा श्रीराम यांनी शेतीकडे पाठ फिरवली. त्यांनी उन्हाळ्यात बर्फाचे गोळे (कुल्फी) विक्री चालू केली. रोजची चांगली कमाई होत असे; मात्र वडिलांच्या मृत्यूमुळे संपूर्ण जबाबदारी श्रीराम यांच्या खांद्यावर पडली. या वेळी त्यांना तालुका कृषी विभाग तसेच जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाचे उत्तम सहकार्य व मार्गदर्शन मिळाले. या ज्ञानाचा चांगला उपयोग शेतीत केला.

सेंद्रिय खत, शेणखत, गांडूळ खत, कोंबडी खतांच्या वापरावर भर दिला. पारंपरिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या शेतीला बगल देत शेतीत नवनवीन प्रयोग केले. अगदी भुईमूग, सूर्यफुल, भाताची पट्टा पद्धत, एसआरटी पद्धत, ड्रम सिडरने भातलागवड असे विविध प्रयोग केल्याने आज या शेतकऱ्याला तालुका, जिल्हा, तसेच राज्य पातळीवरील आदर्श शेतकरी, शेतीनिष्ठ शेतकरी, असे विविध पुरस्कार राज्यपालांच्या हस्ते मिळाले आहेत. यात त्यांच्या पत्नीचादेखील सिंहाचा वाटा आहे. तंत्रशुद्ध पद्धतीच्या शेतीचे श्रीराम पाडवी हे आदर्श ठरले आहेत.

नुकतीच कल्याण पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी रघुनाथ गवारी, कृषी अधिकारी बाबासाहेब रिदि, विस्तार अधिकारी सुनील संत, सुभाष आहेर यांनी पाडवी यांच्या शेतात भेट दिली. कल्याण पंचायत समितीच्या कृषी विभागाने दिलेल्या विविध योजनांची पाहणी केली. यात विविध भातलागवड पद्धत, कडबा कुट्टी यंत्र, महिलांना व्यापारी छत्री, वजनकाटा, खुर्ची, टेबल, तसेच इतर साहित्याची पाहणी व प्रात्यक्षिके पाहिली, विविध योजनांची माहिती दिली. याप्रसंगी शेतकरी श्रीराम पाडवी, दिलीप पाडवी, सरपंच, ग्रामपंचायत कोसले, गोपाळ भोईर, गोविंद भोईर, जनार्दन भोईर, कविता पारधी, तनुजा गायकर, करिष्मा गायकर, अनंता भोईर, दीपक दिवाने, ज्ञानेश्वर चौधरी, लक्ष्मण भोईर, विलास पाडवी, सुभाष भोईर, केदार भोईर आदी शेतकरी व महिला उपस्थित होत्या.

# ठाणे पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रात सोनसाखळी चोरीच्या घटनांत वाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. २० :** सध्या सोन्याच्या दराने अचानक उच्चांक गाठला असून, ठाणे शहर पोलिस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात मात्र 'धूम स्टाइल'ने सोनसाखळी खेचण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. २०२५ या वर्षातील पहिल्या सहा महिन्यांत (जानेवारी ते जून) तब्बल ६५ गुन्हे दाखल झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यापैकी ४५ गुन्हे उघडकीस आले असले तरी २० गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना पूर्णतः अपयश आले आहे. त्यामुळे महिलावर्गामध्ये अजूनही चोरट्यांनी दहशत कायम आहे.

ठाणे पोलिस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्र ठाणे शहरापासून कल्याण-डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर ते थेट अंबरनाथ, बदलापूर या शहरांपर्यंत पसरलेले आहे. या परिसरातून पायी निघालेल्या महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरटे दुचाकीवरून धूम स्टाइलने खेचून चोरटे पसार होतात. जर एखाद्या महिलेने त्या चोरट्यांना विरोध दर्शवल्यास ते त्या महिलेला मारहाण करणे, ढकलून देणे किंवा दुचाकीसोबत फरपटत घेऊन जाणे असे धोकादायक प्रकारही घडले आहेत. अशा दुर्घटनेत अनेकदा महिला गंभीर जखमी होतात, चोरटे मात्र पसार होतात. त्यामुळे अशा चोरट्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांसह महिलावर्गातून होत आहे. जानेवारी ते जून या सहा महिन्यांच्या कालावधीत ठाणे पोलिस आयुक्तालयात सोनसाखळी चोरीचे गुन्हे आतापर्यंत ६५ दाखल झाले आहेत. यापैकी ४५ गुन्ह्यांची उकल झाली आहे. २० गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना अपयश आले आहे. यामध्ये जरी दाखल गुन्हे कमी असले तरी सर्वाधिक पाच गुन्हे उघडकीस आणण्यात भिवंडी परिमंडळाच्या पोलिसांना अपयश आले आहे.

# २९ ग्रामपंचायती पालघर जिल्हा परिषदेमध्ये समाविष्ट करूनच प्रभाग रचना प्रसिद्ध करा

## - काँग्रेसतर्फे वसई तहसीलदारांना सूचना अर्ज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**विरार (बातमीदार) :** वसई तालुक्यातील महापालिकेमधून २०११ मधील तत्कालीन काँग्रेस सरकारच्या शासन निर्णयाने बाहेर असलेल्या २९ ग्रामपंचायती पालघर जिल्हा परिषदेमध्ये समाविष्ट करूनच सुधारित प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करावी, यासाठी जिल्हाधिकारी यांना वसई तहसीलदार कार्यालयातर्फे सूचना अर्ज आज (ता. २०) काँग्रेसतर्फे देण्यात आला. विजय गोविंद पाटिल आणि अ◌ॅड. जिमी मतेस गोन्सालवीस यांच्यातर्फे २९ ग्रामपंचायती जिल्हा परिषदेत समाविष्ट करण्यासंदर्भात अर्ज तहसीलदारांना सादर करण्यात आला. या वेळी जिल्हा काँग्रेस कार्यकारिणी तहसीलदार कार्यालयात हजर होती. वसईतील २९ गावांची महापालिकेमधून बाहेर पडण्याची ही शेवटची लढाई आहे. अधिकृतरित्या ही २९ गावे जवळजवळ १७ वर्षांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाग घेतील व ग्रामपंचायतीचा दर्जा प्राप्त करतील, असे मत विजय पाटील यांनी व्यक्त केले.







Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.